नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २६३ Issue - 263 | वार गुरुवार दि. १२ फेब्रुवारी २०२६ Blow- Thursday Date 12 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राष्ट्रगीतापूर्वी आता तीन मिनिटांचं वंदे मातरम् अनिवार्य

## केंद्र सरकारचा मोठा निर्णय; 'वंदे मातरम्'ला १५० वर्ष पूर्ण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: केंद्र सरकारने आता प्रत्येक अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरम् च्या संपूर्ण सहा कडव्यांचं गायन किंवा वादन अनिवार्य केलं आहे. आता जन गण मन या ५२ सेकंदांच्या राष्ट्रगीतासह आता ३ मिनिटं १० सेकंदांचं वंदे मातरम् सादर करणंही अनिवार्य आहे. याबद्दल गृह मंत्रालयाने १० पानांचा सविस्तर आदेश जाहीर करून हे सर्व नियम स्पष्ट केले.

या नियमावलीत काही महत्त्वाचे नियम जारी केले आहेत. वंदे मातारम् चे सर्व सहा कडवे कोणत्याही सरकारी कार्यक्रमावेळे गाणे किंवा वाजवणे अनिवर्य आहे. तसेच हे गीत ३ मिनिटे १० सेकंदांचं असेल. शिवाय सर्व नागरिकांना राष्ट्रगीताप्रमाणेच यादरम्यानसुद्धा सावधान स्थितीत उभं राहणं गरजेचं आहे. प्रत्येक अधिकृत कार्यक्रमाची वंदे मातारम् ने सुरुवात होईल, त्यानंतर राष्ट्रगीत 'जन गण मन' आणि मग कार्यक्रम सुरू होणार.




नागरी सत्कार समारंभात वंदे मातरम् ची ३ मिनिटे १० सेकंदांची आवृत्ती वाजवणे बंधनकारक आहे. राष्ट्रपतींच्या अधिकृत सरकारी कार्यक्रमांची सुरुवात आणि शेवटही या गीताने होईल. तसेच, राष्ट्रपती जेव्हा टिव्ही किंवा आकाशवाणीवरून देशाला संबोधित करतील त्याच्याही सुरुवाती आणि शेवटी हे गीत गाणं अनिवार्य आहे. तसेच, राज्यपाल आणि उपराज्यपाल यांच्या अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये, परेडमध्ये, जेव्हा राष्ट्रध्वज परेडमध्ये आणला जाईल यासर्व प्रसंगी.

नागरी सन्मान सोहळ्यांमध्ये पद्म पुरस्कार वितरण करण्याच्या कार्यक्रमाचाही समावेश आहे. चित्रपट गृहात किंवा मनोरंजनाच्या कार्यक्रमांना हा नियम लागू होत नाही. जर या ठिकाणांवर वंदे मातरम् सादर करण्यात आलं तर नागरिकांना उभं राहणं गरजेचं नाही. त्याशिवाय सर्व शाळांमध्ये दिवसाच्या सुरुवातीला हे गीत सादर करण्याची शिफारस देखील या नियमावलीत केली गेली. प्रशासनाला याबद्दल निर्देश दिले गेले आहेत.

वंदे मातरम् १८७५मध्ये बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी ७ नोव्हेंबर रोजी या गीताची रचना केली. त्यामुळे ७ नोव्हेंबर २०२५मध्ये या गीताला १५० वर्ष पूर्ण झाले. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांकडून ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या संपूर्ण वर्षासाठी देशव्यापी मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेचाच भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

### जमीन महसूल कायद्यात मोठा बदल

# जमिनीसाठी एन.ए. परवानगीची गरज नाही, जमीन मालकांना दिलासा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : राज्याच्या जमीन महसूल कायद्यात मोठं बदल करण्यात आलाय. आता बिगर कृषी वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता संपली असून, एन.ए. (नॉन-अग्रीकल्चरल) परवानगी घेण्याची सुद्धा गरज राहणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जमीन महसूल कायद्यात मोठा बदल केला आहे.

जमीन महसूल कायद्यात मोठे बदल करण्यात आले आहेत. आता अकृषक कर आकारला जाण्याची सोय पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे. जमीन मालकांना फक्त एकरकमी 'रुपांतरण अधिमूल्य' भरावे लागेल. या रकमेच्या भरपाईनंतर जमीन अकृषक वापरासाठी रूपांतरित केली जाऊ शकते.याशिवाय, सनद घेण्याची गरज देखील संपली आहे. बांधकाम आराखडा मंजुरी मिळाल्यास त्यालाच एन.ए. मानले जाईल. यामुळे जमीन रूपांतर प्रक्रिया जलद, सोपी आणि पारदर्शक होईल. यापूर्वी अकृषक वापरासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र परवानगी घेणे आवश्यक होते. तसेच एन.ए. मंजुरीसाठीही अनेक कागदपत्रांचा भार सहन करावा लागत असे. मात्र, महसूल विभागाने तयार केलेल्या नवीन कार्यपद्धतीनुसार आता बांधकाम आराखडा मंजुरी म्हणजेच एन.ए. मानली जाईल. यामुळे जमीन रूपांतर प्रक्रियेत महत्त्वाची सोपी सुधारणा झाली आहे. महसूल विभागासाठी ही कार्यपद्धती लागू झाली असून, राजपत्रात देखील ती प्रकाशित करण्यात आली आहे.

या निर्णयामुळे जमीन रूपांतर प्रक्रियेत महत्त्वाची सुलभता येईल, त्याचबरोबर अकृषक कराचा त्रासही संपेल. शासनाच्या या निर्णयामुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता येईल, तसेच जमीन मालकांना वेळ वाचवून त्यांचा प्रशासनाचा त्रास कमी होईल. या बदलामुळे आता जमीन मालकांना एन.ए. मिळवण्यासाठी अनेक महिने किंवा वर्षे वेटिंग करत बसण्याची गरज राहणार नाही, तर फक्त 'रुपांतरण अधिमूल्य' भरून ते आपली जमीन अकृषक वापरासाठी रूपांतरित करू शकतील.

# शेअर मार्केट गुंतवणुकीतून २२ कोटींना फसवले, पुण्यात ८५ वर्षीय वृद्धास मोठ्या परताव्याचे आमिष

पुणे : शेअर मार्केटच्या नावाने पैशांचे आमिष दाखवून अनेकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. दिवसेंदिवस सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होताना दिसत असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. त्यातच, आता पुण्यात आतापर्यंतचा सर्वात मोठा सायबर फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला आहे. ८५ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला तब्बल २२ कोटी रुपयांचा गंडा घालण्यात आल्याने शेअर बाजार गुंतवणुकांमध्ये खळबळ उडाली आहे. शेअर मार्केटमध्ये मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवत, आकर्षक आणि हमखास परताव्याचे आश्वासन संबंधितांकडून देण्यात आले होते. या आमिषाला बळी पडून संबंधित ज्येष्ठ नागरिकांनी तब्बल २२ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. शेअर बाजारातील गुंतवणुकीतून नफा मिळवून देण्याच्या नावाखाली आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच गुंतवणूकदाराने तात्काळ सायबर पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणात पुणे पोलिसांनी छत्रपती संभाजीनगरमधून जवळपास आठ जणांना अटक केली आहे.

# १२ वीच्या परीक्षेत कॉप्यांचा सुळसुळाट; केंद्र प्रमुख अन् पर्यवेक्षकांवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : राज्यात १२ वी बोर्ड परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरुवात झाली असून राज्य सरकारच्या कॉपीमुक्त (उेू) अभियानास पहिल्याच दिवशी हरताळ फासण्यात आल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे, परीक्षा केंद्रावरील अधिकारी आणि पर्यवेक्षक विद्यार्थ्यांना कॉपी पुरवत असल्याचे सीसीटीव्हीत कैद झाले असून पालकांकडून संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी, जिल्ह्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाईचे निर्देश दिले असताना आता, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनीही संबंधित केंद्रांची मान्यता रद्द करण्यात येईल, तसेच पर्यवेक्षक आणि केंद्र अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे स्पष्ट केले आहे.

परीक्षा केंद्रातील शाळांना सीसीटीव्ही लावणे इतर सुविधा, पाणी, बसेस वेळेवर पोहचल्या पाहिजे यांसह सर्वच निर्देश दिले होते. तरीही १२ वी परीक्षांत कॉपीच्या घटना घडल्याचं दिसलं. त्यामुळे, कॉपीच्या घटना समोर आलेल्या केंद्रावर रद्द बातलची कारवाई केली जाईल, यापुढे परवानगी दिली जाणार नाही. कॉपी करणाऱ्यांसह केंद्र प्रमुख आणि पालकांवरही कारवाई केली जाईल. ज्या शाळांनी पालन केले नाही, त्यांच्यावर कारवाई केली जाईल अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिली.

कॉपीमुक्त परीक्षा अभियान

राज्यात बारावीच्या परीक्षा प्रगती पथावर आहेत, सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केलं होतं की, निर्भीडपणे परीक्षेला सामोरे जा. गुरुजींनी ज्ञान दानाचे काम केलं आहे. मुख्यमंत्री यांनी मुलांना



सूचना दिल्या होत्या, त्यानुसार कॉपीमुक्त परीक्षा अभियान राबविले जात आहे. त्यामध्ये शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. महसूल विभाग, गृह, ग्रामविकास विभागाचे सहकार्य घेतले जाते, आढावा बैठक घेतली जाते. मात्र, जिथं कॉपीचे प्रकार घडले तिथे कारवाई करण्यात येईल, असे दादा भुसेंनी स्पष्ट केले.

मराठवाड्यात कॉप्यांचा सुळसुळाट

मराठवाड्यातील काही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कॉपी प्रकरणे पुढे आली असून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही कॉप्यांचा सुळसुळाट पाहायला मिळाला. राष्ट्रीय उच्च माध्यमिक विद्यालय, जैतापूर (ता. कन्नड) येथे इयत्ता १२ वीच्या इंग्रजी पेपरदरम्यान मोठा गैरप्रकार उघडकीस आला. परीक्षा केंद्रावरील उउढत फुटेज आणि उत्तरपत्रिकांच्या झेरॉक्स प्रतींच्या आधारे तब्बल १९ पर्यवेक्षक आणि केंद्रसंचालकांवर कठोर कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात एकच खळबळ उडाली आहे. येथील दक्षता समितीचे अध्यक्ष तथा छत्रपती संभाजीनगरचे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित आणि विभागीय बोर्डाचे अध्यक्ष अनिल साबळे यांच्या आदेशानुसार संबंधितांवर कारवाई करण्यात आली. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती अश्विनी लाठकर यांच्या नेतृत्वाखाली भरारी पथकाने संपूर्ण तपास पूर्ण केला.

१९ जणांविरुद्ध कठोर कारवाई प्रस्तावित

या प्रकरणात परीक्षा केंद्र संचालकासह एकूण १९ जणांविरुद्ध कारवाई प्रस्तावित करण्यात आली आहे. जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या पर्यवेक्षक शिक्षक आणि तिथल्या पथकातील अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाचे प्रस्ताव दाखल करण्यात आले आहेत. इतर संस्थांशी संबंधित कर्मचाऱ्यांवर संस्थांतर्गत शिस्तभंगात्मक तसेच कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### खाली बसावं लागल्याने संताप

### ठाकरेंचे नगरसेवक आक्रमक

# मुंबई महापालिकेत पहिल्या दिवशी राडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई: राज्याचं लक्ष लागलेल्या मुंबई (चींलरळ) महापालिकेत अखेर आज महापौरपदी भाजप नेत्या रितू तावडे यांनी शपथ घेत पदभार स्वीकारला. तर, शिवसेनेच्या संजय घाडी यांची उपमहापौरपदी निवड झाली असून त्यांचाही शपथविधी सोहळा संपन्न झाला. त्यामुळे, मुंबई महापालिकेचं (इचउ) कामकाज आजपासून खऱ्या अर्थाने सुरू झाल्याचं पाहायला मिळालं. मात्र, पहिल्याच दिवशी सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये चांगलाच गोंधळ झाल्याचं दिसून आलं. काँग्रेसच्या महिला नगरसेवकांनी आक्रमक होत घोषणाबाजी केली. तर, ठाकरेंच्या नगरसेवकांनीही सभागृहातून काढता पाय घेतला.



महापौर आणि उपमहापौर यांनी सभागृहात भाषण केले, यावेळी शिवसेना नेते उपमहापौर संजय घाडी यांच्या भाषणाची प्रत फाडून ठाकरेंच्या नगरसेवकांनी सभागृहातून काढता पाय घेतला. तर, किशोरी पेडणेकर यांनी शिंदेच्या नगरसेवकांची बॉडी लँग्वेज विक्षिप्त होती, असा आरोप केला आहे. आता, त्यावर उपमहापौर संजय घाडी यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नुकतेच महापौरपदी रितू तावडे आणि उपमहापौरपदी माझी निवड झाल्याची घोषणा पीठासन अधिकारी, आयुक्तांनी केली. महापौर आणि उपमहापौर यांची घोषणा होऊन सभागृह संपलं आहे. महायुतीच्या सगळ्या नेत्यांचे मी आभार मानतो, अशी प्रतिक्रिया उपमहापौर संजय घाडी यांनी दिली. काँग्रेसला महाराष्ट्रात जागा नाही, त्यांच्यासाठी जागा नव्हती, ठाकरेंचे नगरसेवक तिकडे बसले. मुख्यमंत्री यांच्या लाडक्या बहिणी शहर आणि ग्रामीण भागात खुश आहेत. नगरसेवक आणि नगरसेविका त्यांचे आसन मिळण्याचा अधिकार होता, असं मनापासून वाटत. ठाकरेंच्या नगरसेवकांकडून सभात्याग करणे हे वारंवार होईल. मात्र, आजच्या दिवशी होईल अस वाटलं नाही, अशी प्रतिक्रिया घाडी यांनी ठाकरेंच्या नगरसेवकांनी केलेल्या वॉक आऊटवर दिली. लोकशाहीला साजेल अस त्यांनी वागायला पाहिजे होते, जनतेने दाखवलं ना, खोके कोणाकडे आणि ओके कोण झाले ते. जिल्हा परिषदेत आमचे दुसऱ्या क्रमांकावर लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. मग त्यांनी विचारावं ओके कोण? असा सवालही घाडी यांनी केला.

महिला नगरसेवकांना खाली बसाव लागलं

काँग्रेसच्या महिला नगरसेवकांना आज जमिनीवर बसावे लागले, आज आम्ही प्रदुषणाच्या मुद्द्यावर मास्क घालून आलो होतो. मात्र आम्हाला बसायलाही जागा दिली नाही. भाजपच्या पहिल्या महापौर बसल्यानंतर आम्ही मात्र जमिनीवर होतो. देवाभाऊंची बहिण महापौराच्या खुर्चीवर आणि आमच्या बहिणी जमिनीवर होत्या, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नगरसेवक अश्रफ आजमी यांनी दिली.

आम्ही गोंधळ केला नाही, शिंदे गटानं बॉडी लँग्वेज वेगळी ठेवून घोषणाबाजी केली. मुंबईत महिला महापौर बसत आहेत, त्यांना शुभेच्छा. पण त्यांच्या बॉडी लँग्वेज आत्ताच अशा वाईट आहेत. शिंदेंच्या नगरसेवकांची बॉडी लँग्वेज विक्षीप्त होती, असा आरोप ठाकरेंच्या नगरसेविका किशोरी पेडणेकर यांनी केला आहे.

आम्ही पाठच्या मागी होतो, कलकलाट ऐकायला येत होता. घोषणा प्रति घोषणा सुरु होत्या. निवडणूक बिनविरोध होती, त्यामुळे बाकी काही घोषणांचा प्रश्नच नाही. महापौर आणि उपमहापौर निवडणूक होती, आज केवळ औपचारिकता बाकी होती. नेमकं काय झालं हे कळलं नाही, पेडणेकर यांनी आरोप केले हे आत्ताच कळलं. नियोजन दिसलं नाही, २२७ नगरसेवक होते मग लोकांना बसायला का नाही मिळालं? असा सवाल मनसेचे नगरसेवक यशवंत किल्लेदार यांनी केला आहे.

# काळ आला होता पण वेळ नाही, वाशिममध्ये एसटी बसचा भीषण अपघात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वाशिम : वाशिममध्ये एसटी बसच्या अपघाताची मोठी दुर्घटना घडली आहे. एसटी बस रस्त्याने जात असताना अचानक बाईक मध्ये आले. त्यामुळे त्या बाईकस्वाराला वाचवण्याच्या गडबडीत एसटी बस पलटी झाल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत सुदैवाने कुणालाही फार मोठी गंभीर दुखापत झालेली नाही. पण या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. घटना घडली तेव्हा एसटी बसमध्ये तब्बल ३७ प्रवासी होते. या ३७ प्रवाशांपैकी काही प्रवासी किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. त्यांना तातडीने रुग्णालयात पाठवण्यात आल्याची माहिती आहे.

वाशिम जिल्ह्यातील वाशिम-पुसद मार्गावरील सापळी फाटा येथे आज शेगाव ते उमरखेड जाणारी बस पलटी होऊन अपघात झाल्याची घटना घडली. या बसमध्ये एकूण ३७ प्रवासी प्रवास करत होते. मिळालेल्या माहितीनुसार, एम एच १४ बीटी ४३६२ क्रमांकाची बस वाशिम बसस्थानकातून निघाल्यानंतर उमरखेडकडे जात असताना एका बाईक चालकाने अचानक बससमोर बाईक आडवी आणल्याने बसचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. नियंत्रण सुटल्यामुळे बस रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली.

अपघातात काही प्रवासी किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सर्व प्रवासी सुरक्षित असून कोणालाही गंभीर दुखापत झालेली नसल्याचे प्राथमिक माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. जखमींना तात्काळ उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात हलविण्यात आले. तर उर्वरित प्रवाशांना दुसऱ्या बसणे पुढील प्रवासासाठी मार्गस्थ करण्यात आले आहे.



ही घटना अतिशय धक्कादायक होती. एसटी बस थेट पलटी झाली होती. त्यामुळे बसमधील ३७ प्रवाशांचा जीव धोक्यात आला होता. ही बस चालकाच्या नियंत्रणाच्या बाहेर गेली होती. त्यामुळे काहीही अप्रिय घटना घडण्याची शक्यता होती. एसटी थेट पलटी झाली. घटना घडल्यानंतर स्थानिकांनी तातडीने बचावकार्यासाठी धाव घेतली. तसेच प्रशासनानेदेखील घटनास्थळी महत्त्वाची भूमिका निभावली. प्रशासन आणि स्थानिकांच्या मदतीने सर्व ३७ प्रवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात आले. या घटनेनंतर अनेकांच्या मनात काळ आला होता पण वेळ नाही, अशी भावना आली.

## संपादकीय....

### केंद्राचा निर्णय

देशभरात प्रत्येक सरकार कार्यक्रमात आता जन-गण-मन या राष्ट्रगीतापूर्वी, वंदे मातरम गायन बंधनकारक करण्यात आलं आहे. केंद्र सरकारनं हा मोठा निर्णय जाहीर केला आहे. प्रत्येक अधिकृत सरकारी कार्यक्रमांमध्ये वंदे मातरमच्या संपूर्ण सहा कडव्यांचं गायन किंवा वादन अनिवार्य करण्यात आलं आहे. याबद्दल गृह मंत्रालयानं १० पानांचा सविस्तर आदेश जाहीर करून हे सर्व नियम स्पष्ट केले आहेत. सरकारच्या या नव्या नियमावलीनुसार सर्व नागरिकांना राष्ट्रगीताप्रमाणेच वंदे मातरम् सुरू असेपर्यंत सावधान स्थितीत उभं राहणं बंधनकारक आहे. याशिवाय शाळांमध्येही दिवसाची सुरुवात सामूहिक ‘वंदे मातरम’ गायनाने करावी आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रगीत, राष्ट्रगान आणि राष्ट्रीय ध्वजाबद्दल आदराची भावना रुजवावी हा यामागता हेतू असल्याचं सांगण्यात येतं. यावरून आता सत्ताधारी खासदारांनी निर्णयाचं समर्थन केलंय. विरोधकांनी मात्र यावरून सवाल उपस्थित केले आहेत. सरकारने विशेष आदेश दिलेल्या इतर कार्यक्रमांमध्येही हे राष्ट्रगान वाजवलं जाणार आहे. यात महत्त्वाची बाब म्हणजे जर ‘वंदे मातरम’ आणि ‘जन गण मन’ दोन्ही वाजवले जाणार असतील, तर सर्वप्रथम ‘वंदे मातरम’ वाजवलं जाईल. त्यानंतर ‘जन गण मन’ वाजवलं जाईल. या दोन्ही प्रसंगी उपस्थितांनी सावधान स्थितीत उभं राहणं बंधनकारक असेल. मात्र, एखाद्या माहितीपट किंवा न्यूज फिल्ममध्ये राष्ट्रगीताचा भाग म्हणून वाजवलं गेलं, तर उभे राहण्याची सक्ती नसेल. याशिवाय शाळांमध्येही दिवसाची सुरुवात सामूहिक ‘वंदे मातरम’ गायनाने करावी आणि विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रगीत, राष्ट्रगान आणि राष्ट्रीय ध्वजाबद्दल आदराची भावना रुजवावी हा यामागता हेतू असल्याचं सांगण्यात येत आहे. खरंतर, १८७५ मध्ये बंकिमचंद्र चॅटर्जी यांनी रचलेल्या या गीताला १५० वर्षे पूर्ण झाली आहेत. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींकडून ७ नोव्हेंबर २०२५ ते ७ नोव्हेंबर २०२६ या संपूर्ण वर्षासाठी देशव्यापी मोहिमेचाच भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला.

# क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

समाजात एखादी व्यक्ती, संस्था किंवा विचारधारा शांतपणे, न बोलता आपले काम करत असते तो पर्यंत ती फारशी कुणाच्या नजरेत येत नाही. पण ज्या क्षणी त्या कामाचा परिणाम दिसू लागतो, लोकांच्या जीवनात बदल घडू लागतो, प्रश्न विचारले जाऊ लागतात, तेव्हा त्या प्रभावाची पहिली किंमत द्यावी लागते बदनामीच्या स्वरूपात. कारण प्रभाव हा केवळ प्रगतीचा सूचक नसतो; तो विद्यमान सत्ताकेंद्रांना, सोयीस्कर व्यवस्थेला आणि जडलेल्या हितसंबंधांना दिलेला थेट आव्हान असतो. इतिहास साक्षी आहे, प्रभावी माणसाची बदनामी ही अपघात नसून नियोजनबद्ध प्रक्रिया असते, कारण प्रभाव म्हणजे अस्वस्थ करणारी जाणीव. प्रभावी व्यक्ती किंवा विचार समाजाला अस्वस्थ करतो. तो लोकांना प्रश्न विचारायला शिकवतो, स्वीकारलेली गुलामी नाकारायला भाग पाडतो, आणि हे असेच का? असा मूलभूत प्रश्न उभा करतो. ही अस्वस्थता अनेकांना नकोशी असते. कारण प्रश्न विचारणारा समाज म्हणजे हुकूमशाही, अन्याय आणि शोषणासाठी धोक्याची घंटा. म्हणूनच ज्या क्षणी तुमचा प्रभाव वाढू लागतो, त्या क्षणी तुमच्याविरोधात संशय निर्माण केला जातो, तुमच्या हेतूंवर प्रश्नचिन्ह उभे केले जाते, आणि हळूहळू तुमची प्रतिमा मलिन करण्याचे उद्योग सुरू होतात.

आजच्या काळात बदनामी ही तलवारीसारखी समोरून चाल करून येत नाही; ती विषासारखी हळूहळू शरीरात भिनते. कुजबुज, अफवा, अर्धसत्य, अतिशयोक्ती, जुने संदर्भ तोडून मांडणे ही बदनामीची आधुनिक हत्यारे आहेत. सोशल मीडियाच्या युगात तर बदनामीला वेग आणि व्याप्ती दोन्ही मिळाले आहेत. एका क्लिकवर तुमच्यावर आरोप, एका पोस्टवर तुमचा चारित्र्यहनन, आणि एका व्हिडिओत तुमच्या संपूर्ण कार्याचा अपलाप. सत्य तपासण्याची तसदी न घेता लोक निर्णय देतात. कारण सत्य शोधणे मेहनतीचे काम आहे, तर बदनामी स्वीकारणे सोपे. नेमकी प्रभावी माणसेच लक्ष्य कां होतात? हा प्रश्न महत्त्वाचा आहे. समाजात अनेक चुकीच्या गोष्टी घडत असतात, अनेक भ्रष्ट, अपयशी, अनैतिक लोक वावरत असतात, पण त्यांच्यावर फारशी टीका होत नाही. मग बोट का रोखले जाते ते नेहमी काम करणाऱ्यांवरच? कारण निष्क्रिय माणूस कुणाचाच शत्रू नसतो. तो व्यवस्थेला धोका नसतो. पण प्रभावी व्यक्ती ही व्यवस्थेच्या कमतरतांचा आरसा दाखवते. ती सांगते हे शक्य आहे, बदल होऊ शकतो. आणि ही शक्यता अनेकांच्या स्वार्थाला घातक ठरते. म्हणूनच बदनामीचा हेतू एकच असतो, विश्वास तोडणे. लोकांचा विश्वास ढळला, की प्रभाव आपोआप कमी होतो. काम कितीही चांगले असले, तरी संशयाची सावली पडली की समाज मागे सरकतो.



**– प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

इतिहासातील प्रत्येक परिवर्तनाची हीच कथा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर असोत, महात्मा गांधी असोत, महात्मा फुले असोत किंवा आधुनिक काळातील कोणताही समाज परिवर्तनवादी, प्रत्येकाच्या वाट्याला बदनामी आलीच. कुणाला देशद्रोही ठरवले गेले, कुणाला धर्मविरोधी, कुणाला समाजविघातक, तर कुणाला सत्तालोलुप.

परंतु इतिहासाने एक गोष्ट स्पष्ट केली, बदनामी क्षणिक असते, प्रभाव टिकून राहतो. कारण बदनामी शब्दांवर उभी असते, तर प्रभाव कृतींवर. बदनामी ही अपयशाची कबुली असते. जेव्हा तुमच्या विचारांना तर्काने, तुमच्या कामाला पर्यायाने, आणि तुमच्या प्रश्नांना उत्तराने पराभूत करता येत नाही, तेव्हा शेवटचा उपाय म्हणजे व्यक्तीवर हल्ला. हा हल्ला म्हणजेच बदनामी. म्हणजेच बदनामी ही प्रत्यक्षात तुमच्या अपयशाची नाही, तर तुमच्या विरोधकांच्या अपयशाची कबुली असते. त्यांना तुमच्याशी वैचारिक लढाई जिंकता आली नाही, म्हणून त्यांनी चारित्र्यहननाचा मार्ग स्वीकारला. इथेच प्रभावी माणसाची कसोटी लागते. बदनामीला घाबरून तो माघार घेतो का? की सत्याच्या मार्गावर ठाम राहतो? अनेकजण इथेच थकतात. कारण बदनामी वेदनादायी असते. ती केवळ प्रतिमेवर नाही, तर मनावर, नात्यांवर आणि आत्मविश्वासावर आघात करते. पण जो माणूस स्वतःच्या हेतूंवर प्रामाणिक असतो, त्याला एक गोष्ट माहीत असते आज नाही, उद्या नाही, पण एक दिवस सत्य उघड होणारच. फक्त प्रभावी व्यक्तींनीच नाही, तर समाजानेही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. आपण अफवांवर विश्वास ठेवतो का? अर्धसत्य स्वीकारतो का? की प्रश्न विचारतो? कारण बदनामी फोफावते ती प्रेक्षकांच्या मौनामुळे. जर समाज सजग झाला, विवेक वापरू लागला, तर बदनामीचे उद्योग आपोआप निष्प्रभ ठरतील. अन्यथा प्रत्येक नव्या विचाराचा गळा दाबला जाईल आणि समाज स्थैर्याच्या नावाखाली कुजत राहील.

म्हणूनच एक गोष्ट स्पष्टपणे सांगावी लागेल की, क्षेत्र कुठलेही असो, तुमचा प्रभाव पडू लागला की बदनामी अटळ आहे. ती भीतीदायक वाटू शकते, त्रासदायक असू शकते, पण ती तुमच्या अपयशाची खूण नाही; ती तुमच्या यशाची चाहूल आहे. इतिहास कधीही बदनामी करणाऱ्यांच्या नावाने ओळखला जात नाही; तो नेहमी प्रभाव टाकणाऱ्यांच्या नावाने लिहिला जातो. म्हणूनच बदनामीच्या गदारोळातही जेव्हा तुम्ही शांतपणे, ठामपणे आणि प्रामाणिकपणे काम करत राहता, तेव्हाच खरा परिवर्तनाचा अध्याय सुरू होतो. कारण शेवटी एकच सत्य उरते, बदनामीची वादळे थांबतात, पण प्रभावाची दिशा इतिहास ठरवतो.




# कळंब येथे पर्यावरणीय विविध विषयांवर प्रा. डॉ. हनुमंत सौदागर यांचा परिसंवाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब येथे पीएमश्री या उपक्रमांतर्गत दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी नगर परिषद प्राथमिक शाळा क्रं २ येथे मा.प्रा.डॉ.हनुमंत सौदागर यांचे पर्यावरणीय विविध विषयांवर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर परिसंवादाचे सूत्रसंचालन विशाल वाघमारे यांनी केले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक शाळेचे मुख्याध्यापक मुकुंद नांगरे यांनी करतांना विद्यार्थ्यांना पर्यावरणाचा समतोल राखणे आजच्या काळाची गरज असल्याचे सांगितले आणि त्यासाठी प्रत्येकांने स्वतः आणि स्वतःच्या घरापासून सुरुवात केली पाहिजे असे सांगितले.

प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी विद्यार्थ्यांना विविध महापुरुषांच्या सामाजिक कार्याची माहिती सांगून त्यांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कशी जनजागृती केली हे सांगतांना विविध गोष्टी आणि उदाहरणं देऊन प्रत्येक छोट्या छोट्या कामातून पर्यावरणाचे रक्षण करावे हे विद्यार्थ्यांच्या वयानुरूप गोष्टींच्या माध्यमातून सांगितले.कार्यक्रमाच्या समारोपात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, आणि परिसरातील शिक्षणप्रेमी नागरिक यांना पर्यावरण संवर्धनाची शपथ देऊन पर्यावरण संवर्धनाची प्रत्येकाची जबाबदारी आहे असे सांगितले तसेच पर्यावरणाचे संवर्धन केले तरच आपणा सर्वांचे भविष्य सुरक्षित असल्याचे सांगितले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रमेश चव्हाण, विशाल वाघमारे, विनोद राऊत, सयाराणी क-हाड ,सोनाली पाटील गिताश्री नागटिळक, सेविका सोनाली हौसलमल आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# तिसऱ्या मुंबईसाठीच्या भूसंपादन, भूवाटप धोरणास मान्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी मुंबई : नवी मुंबई च्या शेजारी होणाऱ्या तिसऱ्या मुंबईसाठी अर्थात अटल बिहारी वाजपेयी शिवडी–न्हावा शेवा अटल सेतू (मुंबई पारबंदर प्रकल्प) प्रभाव क्षेत्रासाठी नियुक्त ''नवनगर विकास प्राधिकरण'' तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत भविष्यात राबविण्यात येणाऱ्या सर्व विकास प्रकल्पांसाठी भूसंपादन व भूवाटपाबाबतच्या सर्वसमावेशक धोरणास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निर्णयामुळे अटल सेतू प्रभाव क्षेत्रातील नियोजित शहरीकरण, औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स, निवासी–वाणिज्यिक प्रकल्प आणि पायाभूत सुविधांच्या उभारणीस ठोस दिशा मिळणार आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १२६(१) अन्वये परस्पर संमतीने ठरलेल्या रकमेवर कराराद्वारे किंवा २०१३ च्या 'भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम'नुसार भरपाई निश्चित करून भूसंपादन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच कलम १२६(१०) अन्वये रोख मोबदल्याऐवजी चटई निर्देशांक (एफएसआय) किंवा हस्तांतरणीय विकास हक्क (टीडीआर) तसेच आवश्यकतेनुसार सुविधांसाठीबांधकामांसाठी अतिरिक्त एफएसआय टीडीआर स्वरूपात मोबदला देऊन भूसंपादन करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

या धोरणांतर्गत २२.५ टक्के जमीन परतावा धोरण लागू करण्यात येणार आहे. खासगी मालकीची जमीन वाटाघाटीद्वारे संपादन करताना नगर विकास विभागाच्या १ मार्च २०१४ व २८ मे २०१४ रोजीच्या शासन निर्णयांनुसार प्रकल्पग्रस्तांना

> **नवनगर विकास प्राधिकरण व एमएमआर क्षेत्रात नियोजित शहरीकरण व गुंतवणुकीला गती**

विकसित भूखंड देण्याचे धोरण लागू करण्यात येणार आहे. २२.५ टक्के परतावा योजनेअंतर्गत देय भूखंडाचे क्षेत्र ४० चौ. मीटरपेक्षा कमी असल्यास रोख मोबदला देण्यात येणार आहे.

अविकसित भागांमध्ये उद्योगधंदे आणण्यासाठी 'पास–थ्रू पॉलिसी' लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या धोरणानुसार भूसंपादन मोबदल्याची किंमत, पायाभूत सुविधा विकसित करण्याचा खर्च हप्त्यांमध्ये भूखंडधारकाकडून वसूल करण्यात येईल.

भूसंपादनाचा पूर्ण खर्च, नोंदणी शुल्क व अस्थापना शुल्क भूखंडधारकाकडून वसूल करण्यात येईल. एमएमआरडीएकडून १५ टक्के अस्थापना खर्च आकारण्यात येईल. संबंधित क्षेत्रात पायाभूत सुविधा एमएमआरडीए पुरविणार नाहीत. पात्र प्रकल्प घटकास जमीन ''जशी आहे तशी'' तत्वावर देण्यात येईल. भविष्यात वाढीव मोबदला लागल्यास ती रक्कम भूखंडधारकाकडून वसूल केली जाईल. या अटींनुसार एमएमआरडीए व भूखंडधारक यांच्यात करारनामा करण्यात येणार आहे.

परकीय थेट गुंतवणूक (एफडीआय) आकर्षित करण्यासाठी एमआयडीसीच्या धोरणानुसार अटल सेतू प्रभाव क्षेत्रात थेट परकीय गुंतवणूक आणणाऱ्या उद्योगांना प्राधान्याने भूखंड वाटप करण्यात येणार आहे.

किमान १०० एकर जमीन घेणे बंधनकारक असून जमिनीच्या किमतीव्यतिरिक्त प्रति १०० एकर किमान २५० कोटी रुपये गुंतवणूक चार वर्षात करणे अनिवार्य राहील. अविकसित जमिनीची विक्री किंवा हस्तांतरण करता येणार नाही. एकूण विकसित क्षेत्राच्या २५ टक्क्यांपर्यंत क्षेत्र एफडीआय साठी अनुज्ञेय राहील. पात्रता व निकष एमएमआरडीएने निश्चित केलेल्या अटी–शर्तींनुसार राहतील.

जमीन विकसित करण्यासाठी, तसेच भागीदारी तत्त्वावर विशेष प्रयोजन वाहन (एसपीव्ही) स्थापन करून विकास केंद्र उभारण्यासाठी जमीन संकलकांकडून प्रस्ताव मागविण्यात येतील. या धोरणानुसार सविस्तर भूवाटप नियमावली तयार करून शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देश एमएमआरडीएला देण्यात आले आहेत. पायाभूत सुविधांतून शासन व एमएमआरडीए ला जास्तीत जास्त महसूल प्राप्त होईल असा सक्षम रेव्हेन्यू मॉडेल सादर करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे तिसऱ्या मुंबईच्या विकासास गती मिळणार असून मुंबई महानगर प्रदेशातील औद्योगिक व शहरी विस्तारासाठी नवे विकास केंद्र उदयास येणार आहे.

# राज्यात अपर जिल्हाधिकारी यांच्या ११ पदांच्या निर्मितीस मान्यता



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील जिल्हा प्रशासनावर वाढत चाललेला प्रशासकीय ताण कमी करण्यासाठी आणि नागरिकांना महसूलविषयक सेवा अधिक वेगाने व पारदर्शकपणे उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने अपर जिल्हाधिकारी संवर्गातील ११ नवीन पदांच्या निर्मितीस मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्यातील अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे सध्या तब्बल ३९ विषयांचे कामकाज आहे. यामध्ये शासकीय वसुली, गौणखनिज नियंत्रण, नगरपरिषद व ग्रामीण भागातील जमिनीचे व्यवस्थापन, जमाबंदी व जमीन सुधार विधिविधानांची अंमलबजावणी, ग्रामपंचायत व नोंदणी अधिनियमाशी संबंधित बाबी, महसूल अधिनियमांखालील अपीले, गावठाण विस्तार, भूसंपादन प्रक्रिया, बेघर व भूमिहीनांसाठी घरकुल योजना, प्रकल्पबाधित व पूरग्रस्तांचे पुनर्वसन, जिल्हा परिषद व पंचायत समितीविषयक कामकाज अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांचा समावेश आहे.

याशिवायशेतीमहामंडळाच्या जमिनींचे वाटप, कृषीगणना, विविध प्रकारच्या जमीन विक्री व मंजुरी परवानग्या, पिकपैसेवारी निश्चिती, अतिक्रमणविरोधी कारवाई, महसूल विभागाच्या डेटा बँकेचे अद्ययावतीकरण तसेच राजशिष्टाचाराशी संबंधित जबाबदाऱ्या अपर जिल्हाधिकाऱ्यांवर असतात.

दुर्गम व आदिवासी बहुल तालुक्यांमध्ये प्रशासनाची व्याप्ती वाढत असून भौगोलिक विस्तार, लोकसंख्येतील वाढ, विकास प्रकल्पांची संख्या आणि जमिनीविषयक तक्रारींमध्ये झालेली वाढ यामुळे अपर जिल्हाधिकारी कार्यालयांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर ११ नवीन पदांची निर्मिती केल्यास जिल्हास्तरावरील निर्णयप्रक्रिया अधिक वेगवान होणार आहे. प्रलंबित अपील प्रकरणांचा निपटारा लवकर होणार आहे. नागरिकांना कार्यालयात वारंवार फेऱ्या मारण्याचा त्रास कमी होईल, असा शासनाचा विश्वास आहे. विशेषत: भूसंपादन, पुनर्वसन, गावठाण विस्तार आणि अतिक्रमण कारवाई यांसारख्या संवेदनशील विषयांमध्ये वेळेत निर्णय मिळाल्यास सामाजिक तणाव कमी होण्यास मदत होणार आहे. प्रशासनिक सुधारणांच्या दृष्टीने हा निर्णय महत्त्वाचा मानला जात असून, महसूल यंत्रणेची कार्यक्षमता वाढवणे, जिल्हास्तरावरील अधिकारांचे विकेंद्रीकरण करणे आणि 'नागरिक–केंद्रित प्रशासन' मजबूत करणे, या व्यापक उद्दिष्टांचा हा एक भाग आहे.

# सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरणास मान्यता
# राज्यातील पायाभूत सुविधा विकासाला चालना मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्र सार्वजनिक–खासगी भागीदारी धोरणास ( पब्लिक–प्रायव्हेट पार्टनरशिप पॉलिसी) आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या धोरणांमुळे राज्यातील पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यासाठी भांडवल आणि कुशल मनुष्यबळ उपलब्ध होऊन अर्थव्यवस्थेला गती मिळेल. पायाभूत विकास प्रकल्प मुदतीत पूर्ण होण्यासाठी प्रशासकीय चौकट विकसित होईल.

राज्य मंत्रिमंडळाने २८ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या बैठकीत विकसित महाराष्ट्र २०४७ व्हिजन डाक्युमेंटला मान्यता दिली आहे. या व्हिजन डाक्युमेंटमध्ये १०० उपक्रमांचा समावेश आहे. अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधांचा विकास आवश्यक आहे. राज्याची अर्थव्यवस्था २०२९ पर्यंत एक ट्रिलीयन डॉलर, सन २०३५ पर्यंत २ ट्रिलीयन आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलीयन डॉलरवर नेण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी राज्यात अनेक प्रकल्प कार्यरत असून भविष्यातही नवीन प्रकल्प हाती घेतले जाणार आहेत. मात्र पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी प्रचंड गुंतवणूक आणि संसाधनांचा कुशल वापर करण्याची आवश्यकता आहे. यासाठी सार्वजनिक–खासगी भागीदारी करून प्रकल्प राबविण्याची आवश्यकता आहे. असे प्रकल्प राबविण्यासाठीच्या धोरणास मान्यता देण्यात आली.

या धोरणानुसार २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त मूल्याच्या सार्वजनिक–खासगी भागीदारी प्रकल्पांना मंजुरी देण्याचे अधिकार मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील पायाभूत समितीला असतील. तर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीकडे २५ कोटी रुपयांपेक्षा कमी मूल्यांच्या सार्वजनिक–खासगी भागीदारी प्रकल्पांना मंजुरी देण्याचे अधिकार असतील.

या धोरणाची अंमलबजावणी सुलभरित्या व्हावी, यासाठी नियोजन विभागात सार्वजनिक–खासगी भागीदारी कार्यासन स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. विविध विभागांमध्ये विभागांच्या आवश्यकतेनुसार सार्वजनिक–खासगी भागीदारी कार्यासन स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी मित्र संस्थेत सार्वजनिक–खासगी भागीदारी कक्ष स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली.

सार्वजनिक–खासगी भागीदारी प्रकल्पांसाठी व्यवहार्यता तफावत निधी म्हणून २०० कोटी रुपयांचा एकत्रित निधी स्थापन करण्यास आणि पूर्वमान्यतेने त्यातून प्रकल्पांसाठी निधी उपलब्ध करण्यासही मान्यता देण्यात आली. मात्र सध्या सुरू असलेले प्रकल्प त्यांचा सवलत करारनामा आणि निविदा दस्तऐवजातील अटी आणि शर्तीनुसार पूर्ण करण्यासही मान्यता देण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हा नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ साठी १ हजार १४६.३४ कोटीच्या प्रारुप आराखड्यास मान्यता

## जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ चा मंजूर निधी ३१ मार्च २०२६ पूर्वी खर्च करावा : पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

- **अतिवृष्टीने जमीन खरडून गेलेल्या शेतकऱ्यांच्या दोन हेक्टर पर्यंतच्या शेत जमिनीचे पंचनामे झाले पाहिजेत**
- **बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे हीच शासनाची भूमिका, प्रशासनाने शेतकऱ्यांच्या तक्रारीचे तात्काळ निवारण करावे**
- **उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या निधनाबद्दल जिल्हा नियोजन समिती सभागृहात पालकमंत्री महोदय यांच्यासह सर्व समिती सदस्यांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहिली**




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण सन २०२६-२७ साठी राज्य शासनाने ठरवून दिलेली आर्थिक मर्यादा ६९३.९० कोटी होती, त्यामध्ये ३०० कोटींची अतिरिक्त मागणी सह ९९३.९० कोटी, अनुसूचित जाती उपयोजना १४७ कोटी आणि आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्र ५ कोटी ४४ लाख ५४ हजार असा एकूण १ हजार १४६ कोटी ३४ लाख ५४ हजाराचा प्रारूप आराखडा पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीने मान्य केला. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ चा मंजूर निधी सर्व शासकीय यंत्रणांनी ३१ मार्च २०२६ पूर्वी खर्च करावा व हा निधी व्यतगत होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित नियोजन समितीच्या बैठकीत पालकमंत्री श्री. गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी महापौर विनायक कोंड्याल, आमदार सर्वश्री सुभाष देशमुख, देवेंद्र कोठे, राजू खरे, समाधान आवताडे, उत्तम जानकर, नारायण पाटील, अभिजीत पाटील (ऑनलाईन), प्र. जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उप वनसंरक्षक कुलराज सिंग, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सहाय्यक नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला यांच्या सह सर्व संबंधित शासकीय यंत्रणा प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समितीने सन २०२६-२७ चा मंजूर केलेल्या प्रारूप आराखड्या अंतर्गत सर्वसाधारण योजनेमध्ये कृषी व संलग्न सेवा ४७.८२ कोटी, ग्रामीण क्षेत्राच्या विकास योजना ६८ कोटी, जलसंधारण विभाग योजना ४८.५० कोटी, ऊर्जा विकास व अपारंपारिक ऊर्जा ६५ कोटी, शिक्षण विभाग ४० कोटी, महिला व बाल विकास १९.७८ कोटी, आरोग्य सेवांचे बळकटीकरण ७३.४० कोटी, नगर विकासाच्या योजना ११३ कोटी, रस्ते व परिवहन ६७ कोटी, पर्यटन तीर्थक्षेत्र, गड किल्ले, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास ४७.३ कोटी, पोलीस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण १९.७८ कोटी, क्रीडा विभाग ७ कोटी असा निधी ठेवण्यात आलेला आहे.

तर अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत कृषी व संलग्न सेवा ७.२३ कोटी, ऊर्जा ४.६५ कोटी, सामाजिक व सामाजिक सेवा १२८.१७ कोटी, उद्योग व खाणकाम ३४ लाख, नाविन्यपूर्ण योजना ५.२८ कोटी, समाज कल्याण कार्यालय बळकटीकरण ७३ लाख आणि आदिवासी उपयोजना अंतर्गत ५ कोटी ४४ लाख ५४ हजाराचा निधी कृषी, ऊर्जा, सामाजिक सेवा, रस्ते व पूल, नाविन्यपूर्ण योजना साठी ठेवण्यात आलेला आहे.

**बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे-पालकमंत्री**

मागील वर्षी माहे सप्टेंबर ऑक्टोबर या महिन्यांमध्ये सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या शेती पिकाचे तसेच शेतीचे नुकसान झालेले होते त्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी पंचनामे बाबत अनेक तक्रारी मांडल्या त्यावर बोलताना पालकमंत्री श्री गोरे यांनी अतिवृष्टी व पुरामुळे जमीन खरडून गेलेली असल्यास त्या शेतकऱ्यांच्या दोन हेक्टर शेतीचे पंचनामे करण्याबाबत शासनाने निर्देशित केलेले असून प्रशासनाने त्याप्रमाणे पंचनामे करून अहवाल सादर करावेत. पूर व अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही राज्य शासनाची भूमिका असून प्रशासनाने गांभीर्यपूर्वक तक्रारींचे निवारण करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा असे निर्देश त्यांनी दिले.

वीज वितरण कंपनीने शेतकऱ्यांना सुरळीत वीज पुरवठा होईल यासाठी अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या विजेचे खांब व विजेची लाईन तसेच डीपी याची तात्काळ दुरुस्तीबाबत यापूर्वीच निर्देश दिलेले होते, त्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखी स्वरूपात पालकमंत्री कार्यालय तसेच संबंधित लोकप्रतिनिधी यांना सादर करावा असे निर्देश पालकमंत्री श्री गोरे यांनी दिले. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे वाहने तपासणीसाठी थांबवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर येत आहेत, तरी यामध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी स्वतः लक्ष घालून शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या वाहनावर या पुढील काळात कारवाई होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

मंगळवेढा येथील आश्रमशाळेला जिल्हाधिकारी यांनी अचानक भेट देऊन तेथील विद्यार्थ्यांना शाळेकडून चांगल्या प्रकारचे जेवण तसेच अन्य सुविधा उपलब्ध केले जात आहेत का याची तपासणी करावी. यामध्ये कोणीही हलगर्जीपणा करत असेल तर संबंधितावर खडक कारवाई प्रस्तावित करावे असेही पालकमंत्री श्री. गोरे यांनी सांगितले.

**लोकप्रतिनिधी यांच्याकडून विविध मागण्या तसेच सूचना**

आमदार सुभाष देशमुख, आमदार राजू खरे, आमदार अभिजीत पाटील, आमदार उत्तम जानकर, आमदार देवेंद्र कोठे, आमदार समाधान आवताडे, आमदार नारायण पाटील यांनी नियोजन समितीमध्ये विविध मागण्या, सूचना मांडल्या तसेच त्यांच्या मतदारसंघात विकास कामासाठी निधीची मागणी केली.

यामध्ये अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेती पीक व जमिनीचे नुकसान अनुदान मिळणे, खरडून गेलेल्या जमिनीचे पंचनामे व्यवस्थित झालेले नाहीत ते पुन्हा करणे, शाळा दुरुस्तीसाठी निधी मिळणे, सोलापूर शहराला रात्री बारा ते पहाटे पाच या कालावधीत पाणीपुरवठा होत आहे त्यामुळे नागरिकांना त्रास होत असल्याने पाण्याचे नियोजन व्यवस्थित करावे, सोलापूर शहरातील वन विहाराचा विकास पर्यटन केंद्र म्हणून करावा, वीज कंपनीकडून रोहित्र दुरुस्ती तात्काळ करून मिळावी, ग्रामीण भागातील अवैध धंद्यावर पोलिसांनी नियंत्रण ठेवावे, सोलापूर शहरातील महात्मा गांधी प्राणी संग्रहालय मान्यता रद्द झाली आहे ते केंद्रीय समितीकडून मिळण्यासाठी महापालिकेने प्रयत्न करावे, जिल्हा परिषदेच्या महापालिका हद्द वाढ भागातील शाळांना निधी मिळावा, सोलापूर शहरातील भुईकोट किल्ल्याचा विकास व संवर्धन नळदुर्ग किल्ल्याप्रमाणे करावा, तांडा वस्ती सुधार योजनेचा निधी मिळवा, कामे दर्जेदार करावीत तसेच आश्रम शाळांची तपासणी करून तेथील विद्यार्थ्यांना उत्कृष्ट जेवण मिळाले पाहिजे, करमाळा उपजिल्हा रुग्णालयात सिजेरियनची व्यवस्था करावी व अन्य आरोग्यदृष्ट्या अनुषंगिक सुविधा उपलब्ध करून मिळाल्या पाहिजेत, अशा मागण्या करण्यात आल्या.

*प्रारंभी जिल्हा नियोजन समिती सभागृहात राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे अपघाती निधन झालेले होते, त्यानिमित्त सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळून त्यांना श्रद्धांजली वाहिली.

प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार यांनी जिल्हा नियोजन बैठकीतील विषयांचे वाचन केले. यामध्ये १.दि. १६ मे २०२५ रोजी झालेल्या समितीच्या बैठकीचा इतिवृत्तांत व कार्यवाही अहवालास मान्यता. २. जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२६ अंतर्गत जानेवारी २०२६ अखेरच्या खर्चाचा आढावा.

३. जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ च्या प्रारूप आराखड्यास मान्यता. ४.अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने इतर विषयांवर चर्चा, आदी विषयावर चर्चा करण्यात आली. तर शेवटी बैठकीस उपस्थित मान्यवरांचे आभार सहाय्यक नियोजन अधिकारी प्रीतम कुंटला यांनी मानले.

# स्वेरीत 'कोडमाईंड एआय हॅकेथॉन २०२६' उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मधील कॉम्प्यूटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने 'कोडमाइंड एआय हॅकेथॉन २०२६' हा उपक्रम उत्साहात संपन्न झाला.

संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व विभागप्रमुख डॉ. प्राजक्ता सातारकर यांच्या नेतृत्वाखाली 'कोडमाईंड एआय हॅकेथॉन २०२६'चे आयोजन केले होते. दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी 'सायन्स अँड एआय इनेबल्ड आर अँड डी' ही या हॅकेथॉनची मुख्य संकल्पना होती. यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत पवार हे लाभले होते. दिपप्रज्वलनानंतर डॉ. डी.बी. हंचाटे यांनी प्रास्ताविकात 'हॅकेथॉन' या स्पर्धेविषयी सविस्तर माहिती दिली. प्रमुख पाहुणे डॉ. प्रशांत पवार यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये एआयचे मूलभूत तत्त्वज्ञान, आजच्या युगातील एआय समोरील आव्हाने, तसेच संशोधन, उद्योग व समाजासाठी एआय मधील संधी यावर त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. या हॅकेथॉन स्पर्धेमध्ये एकूण ८७ संघांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये ४३५ विद्यार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण एआय-आधारित प्रकल्प सादर केले. विद्यार्थ्यांच्या सर्जनशील कल्पना, तांत्रिक कौशल्य व संशोधनाभिमुख दृष्टिकोन याचे परीक्षकांनी विशेष कौतुक केले. परीक्षक म्हणून डॉ.आर. आर. गिड्डे, डॉ. डी.डी.रोंगे, प्रा.एम. वाय. शेख, प्रा.भाग्यश्री देशमुख, प्रा. व्ही.डी.जाधव, डॉ. अभिषेक एम. एस. यांनी प्रकल्पांचे मूल्यमापन केले. यामधून प्रथम क्रमांक सुशांत थडगे आणि त्यांचा संघ, उपविजेता संदीप गवळी व त्यांचा संघ, द्वितीय उपविजेता बालाजी माने व त्यांचा संघ आणि साक्षी वाघ व त्यांचा संघ या दोन्ही संघात विभागून देण्यात आला. विजेत्या संघांना प्रमाणपत्र व रोख पारितोषिके देण्यात करण्यात आली. 'कोडमाइंड एआय हॅकेथॉन २०२६' मुळे विद्यार्थ्यांना संशोधन, नवकल्पना व कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील व्यावहारिक अनुभव मिळाल्याने हा कार्यक्रम अत्यंत यशस्वी व प्रेरणादायी ठरला. या कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. अरविंद बगले यांनी काम पहिले. यामध्ये उत्कृष्ट नियोजन व व्यवस्थापन केल्याचे दिसून आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पियुष चोपडे, राहुल मदने, मोहसिन पटेल, संकेत शेटे, संदीप गवळी, रुतुराज गांडुळे, श्रावणी खटावकर, प्रीती चंडक, सानिका तोगी, कोमल जगदाळे, श्रावणी कवले, प्रज्ञा गोरे, प्रतीक्षा ढेरे आणि इतर स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी पियुष चोपडे, राम पोतदार व श्रावणी खटाव यांनी केले तर आभार समन्वयक प्रा. सारिका हजारे यांनी मानले.

# पंढरपूर , मंगळवेढा रोडवर भीषण अपघात, अपघात टाळण्यासाठी उपाययोजना कधी होणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : मंगळवेढा पंढरपूर रोडवर भीषण अपघात, जबाबदारी कोणाची प्रशासन चालक ही रस्त्याची अवस्था? मंगळवेढा पंढरपूर मार्गावर आज पहाटे झालेल्या भीषण अपघात आणि परिसरात खळबळ उडाली भर्धाव्याने येणाऱ्या एसटी बस आणि मालवाहू वाहनाची समोरासमोर धडक होऊन म** वाळू वाहन रस्त्याच्या कडेला उलटले. अपघात वाहनाची मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून काही जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे घटनास्थळी पाहता मालवाहू वाहन पूर्णपणे खेळले गेले असून काचेचे तुकडे लोखंडी अवशेष व तेल रस्त्यावर पसरलेले दिसून आले व बच्या पुढील भागालाही मोठी नुकसान झाले आहे हा बळाचा नंतर काही काळ वाहतूक ठप्प झाली होती व. स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमींना बाहेर काढून रुग्णालयात हरवले.

अपघात नेमके कारण काय? प्राथमिक अंदाजानुसार वेग चुकीचा ओव्हरटेक किंवा रस्त्याची अरुंद अवस्था यामुळे हा अपघात घडल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मंगळवेढा पंढरपूर मार्गावर अनेक ठिकाणी खड्डे अपुरी दिशादर्शक फलक आणि रात्री पुरेशी प्रकाशयोजना नसलेले तक्रारी यापूर्वी नागरिकांनी केले आहेत जबाबदारी कोणाची? हा अपघात नेमका कोणाच्या हलगर्जीपणामुळे झाला याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे चालकाचा वेग आणि निष्काळजीपणा रस्त्याची निष्कृष्ट अवस्था व अपुरी दुरुस्ती? वाहतूक नियमाचे पालन न होणे? की प्रशासनाची दुर्लक्ष?

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की या मार्गावर वाढत्या अपघाताकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे वारंवार अपघात होत असतानाही ठोस उपाययोजना होत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे प्रशासनाकडून चौकशीचे आदेश घटनेनंतर पोलिसांनी पंचनामा करून घातपाताचा तपास सुरू केला आहे संबंधित म्हणचालकाची चौकशी करण्यात येत आहे.

सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असल्यास तपासले जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली असल्याची संपूर्ण चौकशी झाल्यानंतर नेमकी जबाबदारी निश्चित होणार आहे दरम्यान या अपघातामुळे पुन्हा एकदा मंगळवेढा पंढरपूर मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न अहिराणीवर आला आहे नागरिकांनी तातडीने रस्त्याची दुरुस्ती, वेग मर्यादित नियंत्रण आणि वाहतूक पोलिसांनी अंमालाबजावणी करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

**ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे नामशेष होण्याचा धोका**

**तक्रार करूनही कारवाई नाही; कचरा व बांधकाम साहित्यामुळे पाणी दूषित**

# अस्वच्छतेच्या विळख्यात पडघ्यातील सार्वजनिक विहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव



भिवंडी तालुक्यातील पडघा येथील नागरिकांची तहान भागवणारी आणखी एक ऐतिहासिक सार्वजनिक विहीर सध्या अस्वच्छता आणि अतिक्रमणाच्या विळख्यात सापडली असून नामशेष होण्याच्या मार्गावर आहे. मुख्य रस्त्याच्या कडेला, डॉ. भांगरे यांच्या घरासमोर असलेली ही दगडी बांधकामातील जुनी विहीर आज अक्षरशः अडगळीत पडली आहे. परिसरात वाढलेल्या अस्वच्छतेमुळे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

विहीर हा पाण्याचा नैसर्गिक स्त्रोत असून भूजल पातळी टिकवून ठेवण्यात तिची महत्त्वाची भूमिका असते. अशा या जलसंपत्तीचे जतन आणि संवर्धन करणे ही स्थानिक प्रशासनाची जबाबदारी असताना प्रत्यक्षात मात्र तिच्याकडे पूर्णपणे कानाडोळा केला जात असल्याचे दिसून येते.

स्थानिक सामाजिक कार्यकर्ते शरद साने यांनी महिन्याभरापूर्वी विहीर स्वच्छता आणि संरक्षणाबाबत पडघा ग्रामपंचायतीकडे लेखी तक्रार अर्ज दिला होता. मात्र त्या अर्जाकडे ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केल्याचा आरोप होत आहे. अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने विहिरीची अवस्था अधिकच बिकट झाली आहे.

सध्या विहिरीच्या सभोवती बांधकाम व्यावसायिकांनी खडी, दगड, विटा, माती तसेच इतर बांधकाम साहित्याचा साठा करून ठेवला आहे. त्यामुळे परिसर अस्वच्छ झाला असून विहिरीच्या रचनेलाही धोका निर्माण झाला आहे. याशिवाय, परिसरातील काही नागरिक तसेच रविवारी भरल्या जाणाऱ्या आठवडा बाजारातील काही दुकानदारांकडून विहिरीत कचरा, प्लॅस्टिक पिशव्या आणि इतर घाण टाकली जात असल्याने पाणी दूषित झाले आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात दगडी बांधकामातून उभारलेली ही विहीर भरपूर झऱ्यांनी युक्त असून एकेकाळी पडघेकरांसह आठवडा बाजारात येणाऱ्या नागरिकांची तहान भागवत होती. पाणीटंचाईच्या काळात ही विहीर मोठा आधार ठरू शकते, अशी स्थानिकांची भावना आहे. मात्र वाढते नागरीकरण, अतिक्रमण आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे तिचे ऐतिहासिक आणि सामाजिक महत्त्व धोक्यात आले आहे. यापूर्वीही ग्रामपंचायतीच्या दुर्लक्षामुळे 'सतीची विहीर' बुजविण्यात भू-माफियांना यश आल्याची आठवण नागरिक करून देत आहेत. आता ही दुसरी विहीरही त्याच मार्गावर जाऊ नये, अशी मागणी होत आहे.

विहिरीतील साचलेली घाण तातडीने काढून परिसराची स्वच्छता केल्यास आठवडा बाजारातील व्यापारी व नागरिकांसाठी ती पुन्हा उपयोगी ठरू शकते. मात्र सध्या कचऱ्याचे साम्राज्य आणि अतिक्रमणामुळे विहिरीचे सौंदर्य पूर्णपणे नेस्तनाबूत झाले आहे. पडघा ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देऊन विहिरीचे संवर्धन, स्वच्छता आणि अतिक्रमण हटविण्याची कारवाई करावी, अन्यथा पडघ्यातील ही ऐतिहासिक जलसंपदा कायमची नामशेष होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# पंढरपूरला अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी : गेल्या अनेक वर्षापासून पंढरपूरमध्ये अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात यावे अशी मागणी होत होती. याची देखील घेऊन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अपर तहसील कार्यालय मंजूर करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

मंगळवारी देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षखाली मंत्रिमंडळाची बैठक झाली या बैठकीमध्ये राज्यात १६ ठिकाणी अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये पंढरपूर व फलटणचा समावेश करण्यात आला आहे. पंढरपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात यावे असे अनेक वर्षापासून ची मागणी होती. पंढरपूर शहर व तालुक्यातील नागरिकांना विविध कामासाठी सोलापूरला जावे लागत होते. त्यामुळे त्यांचा वेळ व पैसा वाया जात होता. म्हणून या ठिकाणी अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू करण्यात यावी अशी मागणी होत होती. अखेर येथील महाराष्ट्र राज्याची मुख्यमंत्री यांनी घेतली आहे. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालयास मंजुरी दिली आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीर्थक्षेत्र पंढरपूर कडे लक्ष केंद्रित केले आहे. पंढरपुरात येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळावा यासाठी कॉरिडॉर ही करण्यात येणार आहे. अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू झाल्यानंतर कॉरिडोरच्या कामाला गती मिळणार आहे.

# महापालिकेनंतर झेडपीवरील भाजपची मुसंडी, पालकमंत्र्याच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब

## सोलापूर जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय जनता पार्टीला स्पष्ट बहुमत; पदाधिकारी-कार्यकर्त्यांमध्ये उत्साह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सोलापूर महानगरपालिकेत भारतीय जनता पार्टी एक हाती वर्चस्व राखल्यानंतर सर्वांचे लक्ष होते ते सोलापूर जिल्हा परिषदेच्या निकालाकडे... इथेही भारतीय जनता पार्टी स्पष्ट बहुमताच्या जवळ गेल्याने भाजपने जिल्ह्यात सुद्धा मुसंडी मारत झेडपीची सत्ता ताब्यात घेतली आहे.

जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वावर आता पूर्णपणे शिकामोर्तब झाल्याचे पाहायला मिळत आहे. नगरपालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या मिळालेल्या काहीशा अपशानंतर सर्वांची लक्ष महानगरपालिकेच्या निवडणूक कडे होते परंतु परफेक्ट नियोजनबद्ध आणि अतिशय आत्मविश्वासामुळे पालकमंत्री जयकुमार गोरे हे महापालिकेच्या निवडणुकीच्या सामोरे गेले सोबतीला आमदार सचिन कल्याण सिटी, आमदार देवेंद्र कोटे शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, आमदार सुभाष बापू देशमुख, आमदार चंद्रकांत देशमुख, यांना घेऊन त्यांनी १०२ पैकी तब्बल ८७ जागा भारतीय जनता पार्टीला मिळवत एक हाती सत्ता वर्चस्व राखले.

जिल्ह्यातील राजकीय समीकरण पाहता भारतीय जनता पार्टीला जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक तशी सोपी नव्हती अकरापैकी सहा आमदार हे विरोधात आहेत तरीही भारतीय जनता पार्टी पालकमंत्री यांच्या नेतृत्वाखाली हे सामोरे गेले आहे.

अक्कलकोट कल्याण शेट्टी, दक्षिण मध्ये आमदार सुभाष देशमुख, उत्तर मध्ये माजी आमदार दिलीप माने, शहाजी पवार, आमदार चंद्रकांत देशमुख, मोहोळ राजन पाटील, यशवंत माने, माळशेजचे माजी आमदार राम सातपुते पंढरपूरचे माजी आमदार प्रशांत परिचारक मंगळवेढ्यात आमदार समाधान आवताडे सांगोल्यात माजी आमदार शिवाजी बापू पाटील मढ्यात रणजीत सिंह शिंदे करमाळ्याचे माजी आमदार संजय मामा शिंदे बार्शीचे माजी आमदार राजेंद्र राऊत जिल्ह्याचे अध्यक्ष शशिकांत चव्हाण, चेतन सिंग केदार, यांना सोबत घेऊन पालकमंत्र्यांनी ही निवडणूक हाताळली.

राज्याच्या ग्रामविकास मंत्री विभागाचा कारभार करत पालक मंत्री यांनी सोलापूर जिल्ह्याकडे जातीने लक्ष दिले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे अपघाती दुर्दैवी निधन झाल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संपूर्ण राज्यातील आपल्या सभा कॅन्सल केल्या त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील सर्व जबाबदारी पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावर आली व सर्वप्रथम सर्वस्व सभा घेतल्या. कुठेही आपले नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कमतरता त्यांनी कमतरता भासू दिली नाही.

सोमवारी जिल्हा परिषदेची निकाल हाती आले व भारतीय जनता पार्टीने मुसंडी मारली आहे या निकालावरून भाजपने जिल्ह्यात मुसंडी मारली असून जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच भारतीय जनता पार्टीने स्पष्ट बहुमत सह स्वतः स्थापन करणार हे जवळजवळ निश्चित झाले आहे. यावरून पालकमंत्री



जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वावर सुद्धा शिका मोर्तब झाला आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

# स्वतःच्या पहिल्या कमाईतून प्रोजेक्टर प्राथमिक शाळेस भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : वाढदिवस म्हटलं की एखादं फाईव्ह स्टार हॉटेल बुक करणे किंवा रिसॉर्ट बुक करणे डीजे लावून आईस केक कापून मनमुराद नाचणे, खाणे पिणेआलेचं अशा पद्धतीने वाढदिवस साजरा करण्याचं तरुणाई मध्ये सध्या फॅड निर्माण झाला आहे.परंतु अशा सर्व चंगळवादाला फाटा देऊन उस्मानाबाद येथील श्वेत शैलेस टिळक या तरुणांनी मात्र महामाता रमाई आंबेडकर याना आभिवादन करून,आपल्या पहिल्या कमाईच्या पगारातून एक छानसा प्रोजेक्टर विकत घेऊन जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिम नगर नळदुर्ग ता.तुळजापूर येथे शाळेस विद्यार्थ्यांसाठी भेट देऊन विद्यार्थ्या समवेत व्हेज बिर्याणीचे जेवण करून आपला वाढदिवस साजरा करून समाजाला एक प्रेरणादायी संदेश दिला आहे.



**विद्यार्थ्या सोबत अनोख्या पद्धतीने साजरा केला वाढदिवस; एका सुसंस्कृत आईची आणि संस्कारक्षम मुलाचा हा प्रेरणादायी उपक्रम**

या बाबत अधिक माहिती असी की चिरंजीव श्वेत टिळक यांच्या मातोश्री सुलक्षणा टिळक ह्या सहशिक्षका या पदावर नोकरीस असून त्या सध्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिम नगर नळदुर्ग येथे सेवेत कार्यरत आहेत.त्या दररोज आपल्या फोर व्हीलर गाडीतून धाराशिव ते नळदुर्ग ये जा करून विद्यार्थी घडवण्याचं काम करता.गेल्या एक महिण्या पासून दरमहा दहा हजार मानधनावर आपल्या स्वतःच्या गाडीवर आपला मुलगा श्वेत टिळक यांना चालकाची नोकरी दिली. उद्देश एकचं मुलाच्या रिकाम्या हाताला काम मिळेल.आणि आपल्या कार्यात मदत होईल या उद्देशाने त्यांनी चालक म्हणून आपल्या मुलाला सोबत घेतले.आणि त्यांना व्यवहारिक दृष्ट्या दरमहा दहा हजार रुपये पगार देण्याचे ही कबुल केलं. तेंव्हा पासून कुमार श्वेत हा आपल्या आई सोबत गाडी चालक म्हणून धाराशिव नळदुर्ग ये जा करत आहे.दि.१ फेब्रुवारी २०२६ रोजी त्याचा महिना भरला आणि आईने त्याला त्याच्या कमाईचा पहिला पगार रुपये दहा हजार दिले.नेमक दि.९ फेब्रुवारी रोजी त्यांचा वाढ दिवस होता. दि.७ व ८ फेब्रुवारी रोजी सलग शाळेला सुट्टी असल्याने दि. ९ फेब्रूवारी रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिम नगर नळदुर्ग येथे माई रमाई आंबेडकर जयंती साजरी करण्याचे आयोजन मुख्याध्यापक एस.यु. शेख यानी केले होते. नेमका त्याच दिवसी श्वेत टिळक यांचा वाढदिवस होता. तेंव्हा त्याने आपला वाढदिवस आपल्या मित्र सोबत साजरा करण्यापेक्षा आपल्याला मिळालेल्या पहिल्या पगारातून त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भिमनगर नळदुर्ग या शाळेत एक छानसा प्रोजेक्टर विकत घेतला आणि आपल्या आई समवेत मात रमाई आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने महामाता रमाई आंबेडकर यांना अभिवादन करून त्यांनी तो प्रोजेक्टर शाळेचे मुख्याध्यापक एस.एस. शेख याना शाळेसाठी भेट म्हणून दिला.आणि खतःच्या पैशातून व्हेज बिर्याणीचे भोजन विद्यार्थ्यांना दिले.अशा प्रकारे विद्यार्थ्या सोबत आपला वाढ दिवस साजरा करून कुमार श्वेत एक वेगळी प्रेरणादायी दिशा समाजाल दिलीआहे.या बाबत बोलताना श्र्वेत यांच्या मातोश्री सहशिक्षीका सुलक्षणा टिळक म्हणाल्या की एका सुसंस्कार मुलाची आई झाल्याचा मला आनंद आहे. या प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक एस.यु. शेख सह पालक विद्यार्थी उपस्थित होते.

# पिंपळगाव (डो) येथे अंबाबाई मंदिर मूर्तीची प्रतिष्ठापना व कळसारोहण सोहळा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब /प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील पिंपळगाव (डो) येथील अंबाबाई देवी मंदिरात अंबाबाई मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. तीन दिवस चाललेल्या या धार्मिक कार्यक्रमात गावकऱ्यांसह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता.दि. ४ फेब्रुवारी२०२६ रोजी सकाळी पूजापाठाने कार्यक्रमास प्रारंभ झाला. सायंकाळी ६ ते ९ या

वेळेत भव्य रथ मिरवणूक काढण्यात आली. संबळ, सनई, हलगी यांच्या गजरात व फटाक्यांच्या रोषणाईत सजविलेल्या रथातून देवीची गावभर मिरवणूक काढण्यात आली. संपूर्ण गावातील महिला, ग्रामस्थ मंडळी तसेच आजूबाजूच्या गावांतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले. रात्री देवी मंदिरात जागरण-गोंधळाचा कार्यक्रम पार पडला. दि. ५ फेब्रुवारी रोजी दिवसभर पूजापाठ व होम-हवन




करण्यात आले. रात्री आराधी मेळा व देवीची भक्तिगीते सादर करण्यात आली. भाविकांनी भक्तिभावाने कार्यक्रमाचा लाभ घेतला. दि. ६ फेब्रुवारी रोजी सकाळी विधीवत पूजापाठ, होम-हवन करून अंबाबाई देवीच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा संपन्न तसेच ह.भ.प.दत्ता महाराज आंबिरकर यांनी कीर्तन सेवा देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. गावातील व परगावातील महिलांचा सहभाग लक्षणीय होता. कीर्तनाचा लाभ घेतलेल्या सर्व महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमासाठी देणगी देणाऱ्या महिला व मुलींना देवीचा फोटो, साडी-चोळी, बांगड्या व प्रसाद देऊन सन्मानित करण्यात आले. विशेष म्हणजे या सोहळ्यात महिलांची उपस्थिती सर्वाधिक होती. हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी गावातील तरुण मंडळी तसेच कामानिमित्त बाहेरगावी असलेल्या युवकांनी पुढाकार घेत परिश्रम घेतले. त्यांच्या सहकार्यामुळे अंबाबाई देवीचा प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा भक्तिमय वातावरणात आणि उत्साहात संपन्न झाला. या वेळी परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाशिवरात्र निमित्त पंढरपुरात बेलीच्या महादेव सेवा परिवाराकडून विविध उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर येथे इंडियन आयडॉल विजेती अंजली गायकवाड ची शंभू शंकर भजन संध्या बेलीचा महादेव सेवा परिवाराच्यावतीने समाज उपयोगी उपक्रमाचे ही आयोजन, पंढरपूर बेलीच्या महादेव सेवा परिवार महाशिवरात्रि निमित्ताने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी श्री बेलीच्या महादेव सेवा परिवार आयोजित रविवार दिनांक १५ फेब्रुवारी रोजी संध्याकाळी सहा वाजता बेलीचा महादेव मंदिर समोर प्रदक्षिणा रोड पंढरपूर या ठिकाणी महाराष्ट्राची लाडकी गायिका अंजली गायकवाड हिचा शंभू शंकर भजन संधीचे आयोजन करण्यात आले असून त्यांना साथ संगम हार्मोनियम अंगद गायकवाड तबला सोहन गौळणी पखवाज ज्ञानेश्वर दुधाने टाळमावली पिसे करणार आहेत तीन दिवस विविध सामाजिक बांधिलकी म्हणून विविध समाज उपयोगी उपक्रम हाती घेतले असून त्यामध्ये शनिवारी १४ फेब्रुवारी रोजी गरजूंसाठी दहा ते दोन मोफत नेत्र तपासणी तसेच मोफत आरोग्यसेवा तसेच रविवारी सकाळी दहा ते पाच वाजेपर्यंत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून या सर्व रक्तदात्यांनी सहकार्य करावी त्यानंतर रात्री भजन संध्या नंतर रात्री नऊ वाजता शंभू महादेवाची महारथी संपन्न होणार असून



सोमवार १६ फेब्रुवारी रोजी १२ ते ३ महाप्रसादाची आयोजन असून सर्व महादेव भक्तांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान श्री बिडीचा महादेव सेवा परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

**महासंचालक सुनील वारे यांचे प्रतिपादन**

# बार्टी माता रमाईवरील संशोधन ग्रंथ लवकरच प्रकाशित करणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे /प्रतिनिधी : डॉ.बाबासाहेबांच्या या सामाजिक लढ्यात रमाईने खंबीरपणे साथ दिली. रमाईचा त्याग खूप मोठा होता.अनेक संकटावर मात करून रमाईने बाबासाहेब परदेशात असताना आपल्या कुटुंबाचा सांभाळ केला.त्यांनी दिलेल्या पाठबळामुळेच डॉ बाबासाहेब आंबेडकर घडले.



बार्टी रमाईच्या संघर्षमय जीवनातील अनेक पैलूंचे बार्टीच्या वतीने संशोधन चालू असून यावर लवकरच रमाई संशोधन ग्रंथ बार्टी प्रकाशित करणार असल्याचे बार्टीचे महासंचालक सुनील वारे यांनी रमाई जयंती महोत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना व्यक्त केले.

महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारक, पुणे येथे दिनांक १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत रमाई महोत्सवाचे आयोजन संयोजक विठ्ठल गायकवाड यांनी केले होते.

रमाई महोत्सवाच्यावतीने महासंचालक सुनील वारे यांचा रमाई ग्रंथ, पंचशिलेची शाल शाल भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी माजी आमदार दीपक पायगुडे, राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ सदानंद मोरे, माजी नगरसेविका लताताई राजगुरू, रमाई महोत्सवाचे अध्यक्ष प्रमोद आडकर, सचिन इटकर, मानसीताई वानखेडे, बार्टीच्या रजनी वाघमारे, विनायक भालेराव, शितल बंडगर वैशाली खांडेकर, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, रमाईच्या लेकी उपस्थित होत्या.

बार्टी संस्थेच्या वतीने रमाई जयंती महोत्सवात दिनांक १ फेब्रुवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ दरम्यान डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांचे मौल्यवान ग्रंथ अनुयायांना विनामूल्य भेट देऊन बार्टीच्या योजनेची माहिती समतादुत यांनी दिली.

बार्टी मुख्यालयात रमाई, तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस आणि रमाई पुतळ्यासही मा महासंचालक यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच रमाईचे जन्मस्थळ वनंद ता दापोली जिल्हा रत्नागिरी येथे बार्टी संस्थेच्या वतीने विस्तार व सेवा विभागाचे विभागप्रमुख डॉ बबन जोगदंड यांच्या उपस्थितीत अभिवादन व प्रबोधनात्मक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

# पंढरपूर तालुका पोलिसांची मोठी कारवाई; आठ लाख २५ हजार रुपये सोन्याचे दागिने जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुका पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर १२६ ऑब्लिक्स २६ बी एन एस कलम ३०४ या गुन्ह्यात फिर्यादी आबासाहेब आजबे राहणार गोपाळपूर यांनी दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी दिलेल्या नुसार त्यांच्या पत्नीचे दागिने हळदी कुंकू साठी जात असताना सुमारे आठ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरी झाल्याबाबत पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथील वरील कर्माप्रमणे सीआर नंबर १२६/२६इछड कलम ३०४ प्रमाणे गुन्हा दाखल होता.



सदर होण्याचे तपासामध्ये फिर्यादी यांच्याकडे सखोल तपास करून त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे फिर्यादी कडून घटनेची संपूर्ण माहिती घेऊन पंढरपूर तालुका पोलिसांनी घटनेच्या दिवशी हळदीकुंकूच्या कार्यक्रमासाठी आलेल्या लोकांकडे विचारपूस करून यातून सखोल तपास करून मंगळवेढा येथील व्यावसायिक अविनाश वाघमारे राहणार मंगळवेढा याला ताब्यात घेऊन सखोल विचार ऊस केले असता उडवा उडवीची उत्तरे दिली अविनाश वाघमारे राहणार मंगळवेढा गोपाळपूर येथील त्यांचा मित्र यांच्याकडून चोरी गेली सर्व दागिने एकूण आठ लाख २५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने एकूण वजन ५५ ग्रॅम काढून दिले व ते पंचायत समक्ष जप्त करण्यात आले. सदर गुन्ह्यातील एकूण ८२५००० सोन्याचे दागिने पंढरपूर तालुका पोलिसांनी वजन करून गुन्ह्यात चोरीस गेलेल्या सोन्याची शंभर टक्के रिकवरी केली आहे.

सदरची कामगिरी माननीय पोलीस अधीक्षक साहेब श्री अतुल कुलकर्णी, माननीय अतिरिक्त पोलीस अधीक्षक श्री प्रीतम यावलकर साहेब, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी श्री प्रशांत डगळे साहेब, पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टीवाय मुजावर, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीमती विभावरी रेळेकर, पोलीस उपनिरीक्षक विक्रम वडणे, पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रेय डोटले, विजू फिटिंग द्वारा गया गायकवाड पोलीस कॉन्स्टेबल सचिन ऐतवाडकर पोलीस कॉन्स्टेबल साळुंखे बाजीराव काकडे सागर गवळी मंगेश रोकडे विजयकुमार आवटी अभिमन्यू गरड ड्रायव्हर पोलीस कॉन्स्टेबल असं नदाफ विलास घाडगे, यांनी काम पाहिले आहे.